VIVEKANAND
G 06052

प्रकरण १

# प्राचीन भारतातील स्त्री जीवन

भारतीय इतिहासलेखनात वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी, प्राच्यविद्यावादी हे प्रवाह होते व आहेत. पण या सर्वच प्रवाहांनी भारतीय इतिहासाचे विश्लेषण करताना समाजातील कनिष्ठ व वंचित वर्गाला वंचित, दूर ठेवले. यास थोडासा अपवाद मार्क्सवादी इतिहासलेखनाचा आहे. इ.स. १९७५ नंतर सबाल्टर्न स्टडी (वंचितांचा इतिहास) हा इतिहासलेखनात नवीन विचार प्रवाह उदयास आला. या वंचितांच्या गटात स्त्रिया दलित, कामगार, शेतकरी, कारागीर, शेतमजूर, सैनिक आदींचा समावेश होतो. वंचित गटातील स्त्री हा घटक भारतातच नव्हे तर जगातील प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासात दुर्लक्षित राहिला आहे. इ.स. १९७५ नंतर भारतातही. स्त्रीवादी इतिहासलेखनास प्रारंभ झाला. इ.स. १९९० नंतर त्यास विशेष गती प्राप्ती झाली. प्रस्तुत ग्रंथ भारतातील स्त्रीवादी इतिहासलेखनातील एक महत्त्वाचा टप्पा ठरेल अशी प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकास अपेक्षा आहे.

'स्त्रीवादी इतिहास' या शब्दाचा शब्दश: अर्थ स्त्रीचा इतिहास असा लावला जातो. पण स्त्रीवादी इतिहासाला एवढा संकुचित अर्थ यासंदर्भात अपेक्षित नाही. **स्त्रीवादी इतिहास म्हणजे इतिहासाच्या सर्व कालखंडांत स्त्रियांची एकूण स्थिती, दर्जा, स्त्रियांचे प्रश्न व त्यांचे योगदान यांचा अभ्यास करणे होय.** जगात काय, भारतात काय, पुरुष वर्गातील इतिहासकारच मोठ्या संख्येने (९० टक्के) होऊन गेल्याने स्त्रीवादी इतिहासलेखनाकडे दुर्लक्ष झाले आहे. पुरुष इतिहासकारांनी त्या त्या देशांतील इतिहास ग्रंथलेखनात महिलांना गौण स्थान दिले. पुरुषी दृष्टिकोनातून स्त्रियांचा इतिहास हा अत्यंत मर्यादित स्वरूपात मांडला गेला. राजकुळातील स्त्रियांबद्दलच इतिहासात लिहिले गेले. समाजातील सर्वसामान्य स्त्रियांना त्यात स्थानच नव्हते. इतिहासाच्या सर्वच कालखंडांत स्त्रिया शोषित राहिल्या. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत त्यांच्यावर अन्याय होत गेले. पण त्यांच्यावरील अन्याय भारतातच नव्हे तर जगातही कोणत्याही इतिहासकाराने फारसे अधोरेखित केले नाहीत. युद्धभूमीवर मारल्या गेलेल्या विधवा स्त्रियांची दु:खे, जीवन कोणीही मांडले नव्हते. जो काही इतिहास लिहिला तो भारतात इतिहासकारांनी वरिष्ठ वर्गातील स्त्रियांचाच इतिहास मांडला. वैदिक काळ स्त्रियांच्या दृष्टीने सुवर्णयुग होते, अशी मते मांडली. पण वैदिक काळातील सर्वसामान्य स्त्रियांच्या जीवनावर मात्र फारसे भाष्य केले गेले नाही. प्राचीन, प्रारंभिक मध्ययुगीन, मुस्लिम कालखंड, शिवशाही

व पेशवाईत सर्वसामान्य स्त्रिया कशा जगल्या? विधवा कशा जगल्या? त्यांच्यावर कोणते अत्याचार व जुलूम झाले होते? कोणत्या रुढी-परंपरांचे त्यांना पालन करावे लागले? याचे विस्तृत संदर्भ कोणत्याही भारतीय इतिहासकारांच्या लेखनात सापडत नाहीत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सर्वसामान्य स्त्रियांच्या योगदानाकडे दुर्लक्ष झाले.

भारतीय स्त्रीवंदी इतिहास अभ्यासातही विविध प्रवाह आहेत.

१) ब्राह्मणी-स्त्रीवादी इतिहास प्रवाह.

२) अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहास प्रवाह.

ब्राह्मणी स्त्रीवादी इतिहास प्रवाह समाजातील निम्न जातीवर्गाच्या स्त्रियांनी इतिहासात कोणते महत्त्वाचे योगदान दिले? यावर हा प्रवाह भाष्य करत नाही. समाजातील उच्चवर्गीय स्त्रियांचे प्रश्न व त्यासंदर्भात समाजसुधारकांचे प्रयत्न याची दखल या इतिहासलेखन प्रवाहात घेतली जाते. एकंदरीत हा इतिहासलेखन प्रवाह अपूर्ण, मर्यादित व संकुचित स्वरूपाचा आहे. याउलट अब्राह्मणी स्त्रीवादी इतिहास प्रवाह हा स्त्रियांच्या शोषणाची दखल घेतो. स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून इतिहासाचे विश्लेषण प्रवाह करतो. फुले-आंबेडकरांनी स्त्री दास्याची केलेली मीमांसा ही अत्यंत वास्तववादी होती. दलित, आदिवासी, कष्टकरी स्त्रियांच्या जागृतीची दखल हा प्रवाह घेतो. अब्राह्मणी इतिहासकार वैज्ञानिक इतिहास संशोधनाचा आग्रह धरतात.

१९८०-१९९० या दशकात स्त्रियांची विविध क्षेत्रांतील व चळवळीमधील कामगिरी अधोरेखित करणारे बरेच स्त्रीवादी इतिहासलेखन झाले आहे. उमा चक्रवर्ती या भारतातील स्त्रीवादी इतिहास अभ्यासिका म्हणून ओळखल्या जातात. डी. डी. कोसंबी, रोमिला थापर, आर. एस. शर्मा यासारख्या इतिहासकारांनीही स्त्रीवादी इतिहासलेखनाकडे दुर्लक्ष केले याचे आश्चर्य वाटते. दलित व आदिवासी, कष्टकरी व अल्पसंख्याक स्त्रियांच्या इतिहासलेखनाकडे दुर्लक्ष झाले याची खंत वाटते.

इ.स. १९५९ मध्ये डॉ. अनंत सदाशिव अळतेकर यांनी 'Position of Women In Hindu Civilization' हा ३७५ पृष्ठांचा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथाच्या लिखाणासाठी विशेषत: प्राचीन भारतीय साहित्याचा वापर मोठ्या प्रमाणात केला आहे. प्राचीन व मध्ययुगीन भारतातील स्त्री जीवन, त्यात झालेले बदल यासंबंधीचा अत्यंत सखोल अभ्यास या ग्रंथात डॉ. अळतेकरांनी केला आहे. विधवांचे जीवन, सती पद्धत, स्त्रियांचे सार्वजनिक जीवन, विवाह पद्धती, स्त्री व मालमत्तेचा अधिकार, स्त्रियांची वस्त्रे व अलंकार इ. विविध पैलू डॉ. अळतेकरांनी या ग्रंथात अत्यंत अभ्यासपूर्ण भक्कम पुरावे देऊन मांडले असले तरी हा ग्रंथ कनिष्ठ जातीतील व मागास जातीतील स्त्री जीवनावर पुरेसा प्रकाश टाकत नाही अशीही या ग्रंथाबद्दल मुख्य तक्रार आहेच.

स्त्रीचे मोठेपण व तिचे महत्त्व अनेक पाश्चिमात्त्य व भारतीय विचारवंतांनी प्रतिपादन

केले आहे. **फ्रेंच विचारवंत चार्लस फेरिअर म्हणतो,** "एखाद्या राष्ट्राकडून स्त्रीला दिल जाणाऱ्या सामाजिक व राजकीय महत्त्वावरूनच त्या राष्ट्राची सांस्कृतिक उंची मोजता येते." **म. गांधींनी म्हटले होते,** "जोपर्यंत महिला पुढे येत नाहीत तोपर्यंत समाजाचे, राष्ट्राचे कल्याण होणार नाही." **म. फुले म्हणतात,** "स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे." **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,** "जिजाऊंमुळे छत्रपती घडले, यशोदेमुळे श्रीकृष्ण घडले, कौसल्येमुळे राम घडले. त्यामुळेच स्त्री माता गुरूस्थानी मी प्रथम वंदना करतो." **आचार्य विनोबा भावेंनी म्हटले होते,** "दया, क्षमा, शांती, माया, शक्ती, भक्ती, मुक्ती, नीती इ. गुणवैशिष्ट्ये महिलांमध्येच जास्त असतात." **डॉ. आंबेडकर म्हणतात,** "स्त्री जात समाजाचा अलंकार आहे. आपला, आपल्या मुलाबाळांचा, आपल्या कुटुंबाचा व कुळांचा लौकिक स्त्रियांवर अवलंबून आहे. स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे."

आज २१ व्या शतकात प्रवेश करून १३ वर्षे संपलेली आहेत. आज विज्ञानयुग, संगणकयुग आले. ज्ञानाचा प्रचंड विस्फोट झाला. शिक्षण खेड्यापाड्यांत तळागाळापर्यंत पोहोचले. स्त्री जीवन आमूलाग्र बदलले. साहित्य, संगीत, नाट्य, क्रीडा, चित्रपट, गायन, अंतराळ संशोधन, स्वयंसेवी संस्था इ. सर्व क्षेत्रांत स्त्रिया महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. अध्यापन, प्रशासकीय सेवा, उद्योगजगत, बचत गट, आयटी कंपन्या, राजनीती, वित्तीय संस्था इ. क्षेत्रांतही स्त्रिया महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. हे एक उज्ज्वल चित्र आहे. पण दुसरे चित्रही भयंकर आहे. निरक्षरता, स्त्री दास्य परंपरा, अंधश्रद्धा, हुंडाबळी, लैंगिक छळ, कौटुंबिक अत्याचार, जुलूम, उन्हातान्हात काबाडकष्ट करणे या समस्यांत अडकून पडलेल्या कोट्यवधी स्त्रिया हेही चित्र भारतात पाहावयास मिळते. स्त्री भ्रूणहत्येचाही प्रश्न अलीकडे प्राधान्याने चर्चिला जात आहे. आज स्त्री घरातही सुरक्षित नाही आणि घराबाहेर तर नाहीच नाही. आदिवासी, मुस्लिम स्त्रियांची अवस्था वाईट झाली आहे. ही दोन परस्परविरोधी चित्रे भारतात आज पाहावयास मिळत आहेत.

प्रस्तुत ग्रंथात प्राचीन, मध्ययुगीन कालखंड, शिवशाही व पेशवाईचा कालखंड, ब्रिटिशांच्या काळात स्त्री जीवनात झालेले परिवर्तन, स्त्री कार्यकर्त्या, स्त्रियासंबंधीचे कायदे, विविध चळवळीत स्त्रियांचे योगदान इ. विविध अंगांनी स्त्री जीवनाचा व स्त्रियांच्या ऐतिहासिक योगदानाचा अभ्यास करण्यात आला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या स्त्रियांच्या कार्याचाही संक्षिप्त आढावा घेतला गेला आहे. विषयाचा आवाका खूप मोठा असला तरी प्राचीन काळापासून आजपर्यंत भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवनाचे एक समग्र दर्शन या ग्रंथरूपाने वाचकांपुढे ठेवण्याचाच प्रयत्न केला आहे.

स्त्रीवादी इतिहासलेखन हे तळाकडून इतिहासलेखन (History From Below)

या स्वरूपाचे आहे. स्त्रीवादी इतिहासलेखन ही पारंपरिक इतिहासलेखनातील पुरुषशाही गृहीतके व स्त्रियांचे अदृश्यीकरण याविरुद्धची प्रक्रिया आहे. स्त्रीवाद ही सर्वंकष मूलभूत भूमिका आहे. मानव इतिहासाच्या निर्मितीत स्त्रियांना पूर्णपणे डावलले गेले आहे. कोणताच देश, प्रांत त्यास अपवाद नाही. दुर्लक्षित राहिलेल्या 'लिंगभाव' (Gender) या प्रवर्गावर भर देऊन इतिहासलेखन करणारा प्रवाह म्हणजे स्त्रीवादी प्रवाह होय. पारंपरिक इतिहासाची साधने गृहीतके, संशोधन पद्धती, कालखंड निर्मिती (Periodisation) व व पितृसत्ताक चष्म्यातून लावलेला इतिहासाचा अन्वयार्थ या सर्वांनाच स्त्रियांचा इतिहास आव्हान देत आहे. स्त्रियांचा इतिहास व स्त्रीवादी इतिहास हे इतिहासलेखनातील नवे प्रवाह आहेत. या परिप्रेक्ष्यातून भारतीय इतिहासाची मांडणी करण्यासाठी स्त्रीवादी इतिहासकारांनी नुकतीच कुठे सुरुवात केली आहे. अजून त्यांना बराच मोठा टप्पा गाठावयाचा आहे. राधाकुमार व्ही. गीता, उमा चक्रवर्ती, अनधा तांबे, डॉ. विद्युल्लता भागवत, शर्मिला रेगे, सरिता देहाडराय, रोहिणी गवाणकर प्रतिभा रानडे वगैरे स्त्रीवादी इतिहासाच्या संशोधिका/अभ्यासिका म्हणून पुढे आल्या आहेत.

आतापर्यंत भारताचा इतिहास हा अभिजनवर्गाने अभिजनवर्गासाठीच लिहिला गेला आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळींचे श्रेय अभिजनवर्गाने (Elite) स्वत:कडे घेतले आहे. शेतकरी, कामगार, आदिवासी व स्त्रिया यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदानाकडे दुर्लक्ष केले आहे. डॉ. आर. सी. मुजुमदार यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास लिहिला. ९०० पृष्ठांच्या या इतिहासग्रंथात स्त्रियांच्या कामगिरीला फारसे महत्त्व दिले नाही. तिसऱ्या खंडात फक्त २० पानांत १६ स्त्रियांचे त्रोटक उल्लेख आले आहेत. आझाद हिंद सेनेतील स्त्रियांच्या योगदानाबद्दल तर फारच त्रोटक माहिती आहे. आदिवासी स्त्रियांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जो लढा दिला त्याची नोंद राष्ट्रवादी इतिहासकारांनीही घेतली नाही.

'छोडो भारत' आंदोलन, हैदराबाद मुक्तिसंग्राम यात बहुजन समाजातील निरक्षर, अर्धशिक्षित ग्रामीण महिलांनी जे योगदान दिले त्याची नोंद ब्राह्मणी इतिहासकारांनी घेतली नाही. मुळशी धरण होऊ नये म्हणून मुळशी खोऱ्यातील स्त्रियांनी तुरुंगवास भोगला. त्याची नोंद इतिहासकार घेत नाहीत. सत्यशोधक चळवळ, दलित चळवळ, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, स्वयंसेवी संस्था इ. ठिकाणच्या महिलांच्या योगदानाकडे इतिहासकारांचे दुर्लक्ष झाले आहे. 'भारतातील राष्ट्रवादी किंवा वसाहतेतर इतिहासामध्ये मुस्लिम स्त्रियांचे उल्लेख किंवा त्यांचे योगदान फारसे नोंदवले गेले नाही. भारतात १८,१९ व्या शतकात युरोपियन लोकांच्या जीवनात 'नेटिव्ह स्त्रिया' आल्या, त्यांचीही नोंद इतिहासकारांनी घेतली नाही. या पार्श्वभूमीवर स्त्रीवादी इतिहासकारांसमोर मोठे आव्हान आहे, त्यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या आहेत.

## प्राचीन भारतातील स्त्रियांचा दर्जा

प्राचीन कालखंडातही स्त्रियांच्या दर्जानुसार भिन्न कालखंड पडतात असेच दिसते.

१) आदिम काळ आणि स्त्रियांचे जीवन.

२) सिंधू संस्कृतीतील स्त्रियांचे स्थान.

३) वैदिक काळातील स्त्रियांचे स्थान.

४) स्मृतिकाळ व सूत्रकाळात स्त्रियांचे स्थान/दर्जा.

५) बौद्ध काळातील स्त्रियांचे स्थान/दर्जा.

६) मनुस्मृती काळात स्त्रियांचे स्थान.

७) गुप्त-वाकाटक काळातील स्त्रियांचे स्थान.

८) हर्षोत्तरकालीन स्त्रियांचे स्थान (१२०० पर्यंत)

प्राचीन कालखंडात स्त्रियांचा दर्जा कसा होता ? यासंबंधीचा अभ्यास करण्यासाठी खालील साधने उपलब्ध आहेत.

१) वैदिक साहित्य

२) महाकाव्ये व पुराणे

३) बौद्ध धर्माचे साहित्य व जैन धर्माचे साहित्य

४) धर्मसूत्रे

५) स्मृती साहित्य

६) कौटिल्याचे अर्थशास्त्र

७) संस्कृत व प्राकृत साहित्य

८) परकियांची प्रवासवर्णने.

९) पुरातत्वीय साधने - मंदिरे, लेण्या, मूर्ती.

**शेतीचा शोध स्त्रियांनी लावला :**

भारतात काय किंवा जगात काय, जेव्हा समाज हा टोळी समाज होता, जेव्हा समाज स्थिरावला नव्हता त्या काळात अन्न जमा करणे, प्राण्यांची शिकार करणे, मासे पकडणे, ही सर्व कामे स्त्री-पुरुष एकत्र करत. टोळी समाज असताना शेतीचा शोध स्त्रियांनीच लावला असे म्हटले जाते. जमिनीतून कंद काढणे, झाडांची फळे तोडणे, शेतीची मशागत करून शेतीत पीक घेणे, धान्य साठवणे, पशुपालन, दुग्धव्यवसाय इत्यादी सर्व टप्प्यांवर स्त्रियांचे मोठे योगदान होते. मातृसत्ताक समाजाबद्दल आजही कथा-दंतकथा प्रत्येक देशात प्रचलित आहेत. पुढे पितृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात आली, गृहसत्ता व अर्थसत्ता स्त्रियांच्या हातून पुरुषांच्या हाती गेली. कुटुंबप्रमुखाने बायको, मुले यांच्यावर स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित केले. त्यानंतर कुटुंबातील स्त्रियांचा दर्जा घसरत गेला. भारतातही हेच घडले.

एखाद्या संस्कृतीचा दर्जा निश्चित करण्यासाठी त्या संस्कृतीमध्ये स्त्रियांचे जीवन कसे होते हे पाहिले जाते. स्त्रियासंबंधीचे कायदे, मालमत्तेचा अधिकार, रूढी व परंपरा, वस्त्र, अलंकार, संगीत, नृत्य, शिक्षण आदी गोष्टींवरून स्त्रियांचा दर्जा निश्चित केला जातो. प्राचीन कालखंडात स्त्रियांचा दर्जा कसा होता ही बाब खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) मुलीच्या जन्माचे स्वागत केले जात नव्हते :** प्राचीन कालखंडात पितृसत्ताक कुटुंब पद्धती असल्याने सर्वसाधारणपणे मुलाच्या जन्माचे स्वागत केले जाई. मुलगा कुटुंबाचे नाव पुढे चालवतो, धार्मिक कार्य पार पाडतो तसेच कुटुंबाचे रक्षण, पोषण करतो असा समज होता. युद्धजन्य परिस्थितीमुळे मुलांच्या जन्माचे स्वागत होई; परंतु मुलींचा जन्म मात्र घरामध्ये आनंदाने स्वीकारला जात नव्हता. उत्तर वैदिक कालखंडात स्त्रियांवर जेव्हा अनेक बंधने टाकली गेली तेव्हा मुलगी हे दु:खाचे व चिंतेचे कारण होय असा समज निर्माण झाला. मुलगी व्हावी म्हणून प्रार्थना केल्याचे एकही सूक्त ऋग्वेदामध्ये नाही.

**२) कन्या वध :** कन्या वधाची प्रथा प्राचीन कालखंडात नव्हती. वैदिक कालखंड, महाकाव्य कालखंड व संस्कृत साहित्यामधून कन्या वधाचे उल्लेख येत नाहीत. **डॉ. ए. एस. अळतेकर लिहितात,** ''एकूण प्राचीन काळात कन्या वधाची प्रथा फारच थोड्या प्रमाणात असावी. कारण तशी ती मोठ्या प्रमाणात असती तर वैदिक वाङ्मयात व त्यानंतरच्या वाङ्मयात या प्रथेचे उल्लेख आले असते. मध्ययुगीन काळापासून विशेषत: राजस्थानमध्ये ही प्रथा रूढ झाली.

**३) स्त्री शिक्षण :** वैदिक काळात स्त्रियांना पुरुषाप्रमाणे स्वतंत्र बौद्धिक, आध्यात्मिक जीवन जगता येत असे. मुलाप्रमाणे मुलींचे उपनयन होत असे. स्त्रियांना वेदविद्या, संगीत, नृत्य यांचे शिक्षण दिले जाई. विद्यार्थिनींचे दोन प्रकार होते.

१) ब्रह्मवादिनी २) सद्योद्वाहिनी.

ब्रह्मवादिनी स्त्री आयुष्यभर अविवाहित राहून ब्रह्मचर्य पाळून वेद व ब्रह्मविद्येचा अभ्यास करत. लोपामुद्रा, घोषा, विश्वतारा, अपाला, गार्गी वगैरे स्वतंत्र वृत्तीच्या विद्याभ्यासात प्रतिष्ठा मिळवलेल्या स्त्रियांची नावे ऋग्वेदात आहेत. मिथिलेचा राजा जनक याच्या सभेत गार्गी वगैरे अनेक ब्रह्मवादिनी स्त्रिया चर्चेत भाग घेत असत. ब्रह्मवादिनी स्त्रिया व्याकरण, मीमांसा या शास्त्रांचा अभ्यास करत व अध्यापनाचा व्यवसायही करत. अर्थात, अशा स्त्रियांची संख्या फारच कमी होती.

'सद्योद्वाहिनी' विद्यार्थिनी शिक्षण घेऊन सोळा वर्षापर्यंत अनुरूप पतीशी विवाहबद्ध होत. अथर्ववेदात 'स्त्रीला शिक्षण मिळाले तर स्त्री उत्तम संसार करू शकेल असे म्हटले होते.'

वैदिक कालखंडात स्त्रिया वेदांतील मंत्र म्हणत. त्या वेदांचा अभ्यास करत. गुरुकुलातून अध्यापक म्हणूनही काम करत. धर्म, तत्त्वज्ञान, विश्वाची उत्पत्ती वगैरे गहन व जटिल विषयांवर पुरुषांच्या बरोबरीने वादविवाद करत. जनक आणि सुलभा, याज्ञवल्क्य व गार्गी, याज्ञवल्क्य व मैत्रेयी तसेच शंकराचार्य व विद्याधरी यांचे वादविवाद सार्वजनिक ठिकाणी झाले होते. म्हणजेच मनूपूर्व काळात काही स्त्रिया विद्याभ्यासाच्या जोरावर उच्चतमपदी जाऊ शकत असत.

**४) प्रौढ विवाहाची पद्धत :** ऋग्वेदात प्रौढ विवाहाची पद्धत रूढ होती असे दिसते. सण उत्सव आदीप्रसंगी तरुण मुली दागदागिने घालून उपस्थित राहत असत. ऋग्वेद कालखंडात तरुण मुलींना आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. पती निवडीसाठी आई-वडिलांच्या संमतीची गरज नव्हती. घोषा या स्त्रीचा विवाह खूप उशिरा झाला होता. महाभारतातील शकुंतला, देवयानी, सत्यवती, दमयंती, कुंती, द्रौपदी, सुभद्रा या स्त्रियांचे विवाह तरुण वयात झाले होते. एखाद्या स्त्रीला योग्य वर मिळाला नाही तर ती आपल्या पित्याच्या घरी राहत असे.

बौद्ध साहित्यातही बालविवाहाचे उदाहरण सापडत नाही. जातक कथांमध्ये गांधर्व विवाहाचे उल्लेख आले आहेत. गांधर्व विवाह करणारे प्रौढच असत. विवाह हा करार नव्हता तर पवित्र बंधन होते. इ. स. पूर्व ५ व्या शतकापर्यंत प्रौढ विवाहाची पद्धत होती. नंतर मात्र ही पद्धत मागे पडली. इ. स. पू. ४०० ते इ.स. पू. १०० याकाळात ऋतुप्राप्तीच्या अगोदरच मुलींचे लग्न झाले पाहिजे असा विचार स्मृतिकारांनी मांडला. त्यामुळे बालविवाहाची प्रथा रूढ झाली.

डॉ. अळतेकर यांच्या मते, ''इ.स. पूर्व तिसऱ्या शतकापर्यंत मुलींच्या विवाहाचे वय १५ ते १६ होते. त्यानंतर धर्मशास्त्रकारांचे मत बदलले व मुलींच्या विवाहाचे वय कमी झाले. ऋतुप्राप्तीनंतरचे विवाह हे पाप समजले जाऊ लागले व मुलींचे लग्न ९ ते १० वर्षांच्या आत झाले पाहिजे अशी प्रथा रूढ झाली. धर्मशास्त्रकारांच्या आग्रहाने बालविवाह समाजात कायमचे रूढ झाले. मनू म्हणतो की, ''विवाहाच्या वेळी पुरुषाचे वय ३० असावे तर स्त्रीचे वय १२ असावे. बालविवाहाची ही प्रथा १९ व्या शतकाच्या शेवटापर्यंत कायम राहिली. बालविवाहाच्या रूढीमुळे मुलींचे शिक्षण संपुष्टात आले. समाजातील त्यांची प्रतिष्ठा कमी झाली. विकासाची संधी मिळाली नाही व स्त्री बंदिस्त झाली.

पाराशर, व्यास या स्मृतिकारांनी ८ ते १० हेच मुलींचे वय सांगितले आहे. सर्व स्मृतिकारांनी ऋतुप्राप्ती होण्यापूर्वी मुलींचे लग्न करावे नसता पित्याला भयंकर पातक लागते असे म्हटले आहे.

**५) नियोगाची पद्धत :** विधवा स्त्रीने मृत पतीच्या भावाशी किंवा अत्यंत

जवळच्या नात्यातील पुरुषाशी लग्न करणे म्हणजे नियोग पद्धत होय. ऋग्वेदात एका ऋचेत विधवा स्त्री आपल्या दिराशी लग्न करते असा उल्लेख आला आहे. पुराणातही नियोग पद्धतीचे उल्लेख आहेत. पंडू व धृतराष्ट्र हे नियोगपुत्रच होते. कन्या ही कुळाला दिलेली असते. या समजामधून ही प्रथा रूढ झाली. गुप्त काळात रामगुप्ताची सौंदर्यवती विधवा पत्नी ध्रुवदेवी हिने आपल्या पतीच्या मृत्यूनंतर आपला दीर चंद्रगुप्त दुसरा याच्याशी विवाह केला होता. पतिव्रत कल्पनेच्या वाढीने नियोग पद्धत नंतरच्या काळात निषिद्ध मानली गेली. मनूने ही पद्धत निषिद्ध मानली होती तरीही त्याने नियोग संततीच्या बाबत अनेक नियम सांगितले होते.

**६) एकपत्नीत्व :** सर्वसाधारणपणे प्राचीन काळात समाजात एकपत्नीत्व रूढ होते व एकपत्नीत्व हा भारतीय समाजाचा आदर्श मानला गेला होता. सर्व स्मृतिकारांनी एकपत्नीत्व आदर्श मानले आहे.

**७) बहुपत्नीत्वाची पद्धत :** ही पद्धत प्रामुख्याने राजकुळांत किंवा क्षत्रिय वर्गापुरती सीमित होती. श्रीमंत लोक एकापेक्षा अधिक स्त्रियांशी विवाह करत. पण बहुपत्नीत्वावर बंधने होती. सोळा सहस्त्र स्त्रियांचा पती श्रीकृष्ण, १०० स्त्रियांचा पती हरिश्चंद्र असे उल्लेख प्राचीन साहित्यात आहेत. दशरथाला तीन बायका होत्या. पुरुषाला अनेक बायका असणे पाप नाही असे आदिपर्वात म्हटले आहे. पुत्रप्राप्तीला महत्त्व असल्याने पुरुषाला अनेक बायका करण्याची परवानगी शास्त्रकाराने दिली होती.

**८) बहुपतीत्व :** वैदिक कालखंडात बहुपतीत्वाचा उल्लेख कोठेच नाही. बहुपतीत्वाची उदाहरणे प्राचीन भारतीय साहित्यात आढळत नाहीत. द्रौपदीचा पाच पांडवांशी झालेला विवाह हा अपवाद मानावा लागेल.

**९) स्त्रीशिवाय पुरुषाला पूर्णत्व नाही :** तैतरीय व शतपथ ब्राह्मण ग्रंथात पत्नी म्हणजे पुरुषाचा अर्धा भाग. म्हणून जोपर्यंत पत्नीची प्राप्ती होत नाही तोपर्यंत त्याला पूर्णत्व येत नाही असे म्हटले आहे. पत्नी ही गृहाची स्वामिनी, तिच्यामुळे सुख नांदते व कुलवैभव वाढते. स्त्री ही गृहाची प्रतिष्ठा आहे असा समज होता. ब्राह्मण ग्रंथांनी पत्नीला व त्यानुसार गृहस्थाश्रमाला फार महत्त्व दिले आहे. पत्नी नसेल त्याला यज्ञ करण्याचा अधिकार नाही इ. गोष्टी रूढ झाल्या. पत्नी व मुले यांच्यामुळेच पुरुषाला पूर्णत्व येते. गृहकर्तव्य, पतीसेवा व अपत्यसंगोपन ही स्त्रीची महत्त्वाची कामे होती.

पुरोहित, गुरू, पिता या सर्वांहून स्त्री श्रेष्ठ आहे असे शास्त्रकारांनी मानले होते.

ज्या समाजात स्त्रियांना आदराने वागवले जाते तेथे देवता संतुष्ट होतात; पण जेथे त्यांची अवहेलना होते तेथे कोणत्याही कार्यात त्यांना यश येत नाही असे मनूने म्हटले आहे.

**१०) सतीची पद्धत :** ऋग्वेद काळात सतीची पद्धत सर्वत्र प्रचलित नव्हती.

फक्त राजन वर्गात ती असावी. ऋग्वेदात सतीचे काही उल्लेख आले आहेत. पंडूची पत्नी माद्री सती गेली होती. रामराज्यातही सतीचे उल्लेख आहेत. ऋषिमुनी, गांधारी, शैब्या, हेमवती, जांबवती इ. श्रीकृष्णाच्या भार्यांनी श्रीकृष्णाच्या मृत्यूंतर अग्निप्रवेश केला होता. हर्षाची आई सती गेली होती. हर्षाची बहीण राजश्री हिनेही सती जाण्याची तयारी केली होती. कालिदासाच्या 'कुमारसंभवा'तील रती मदनाच्या मृत्यूची कथा ऐकून सती जाण्याची सिद्धता करते.

अर्थात, राजन कुटुंबातील सर्वच विधवा सती जात होत्या असे नव्हे. पती निधनानंतरही राज्यकारभार पाहिल्याची उदाहरणे आहेत. उदा. सातवाहन राणी नागनिका, प्रभावती गुप्ता. महाभारतातील युद्धानंतर कोणीही स्त्री सती गेल्याचा उल्लेख आढळत नाही. प्राचीन काळात स्त्री हा नियम नव्हता, तर अपवाद होता.

मनूने मात्र पती निधनानंतर स्त्रियांनी सती न जाता ब्रह्मचर्याचे पालन करावे व काळ कंठावा असे सांगितले आहे. पण अनेक शास्त्रकारांना पतीच्या मागे स्त्रीने जिवंत राहावे हेच मान्य नाही. शंख, अंगीरस व हरित यांचा विधवेने सती गेलेच पाहिजे असा दंडक होता. तरीही त्याच काळात या चालीचा निषेध करणारे शास्त्रकारही होते. त्यामुळे गुप्त काळाच्या अखेरपर्यंत या पद्धतीचा जोर फार नसावा असे तज्ज्ञांचे मत आहे.

**११) स्वयंवर पद्धती :** इंदुमती, सीता, द्रौपदी, दमयंती यांच्या स्वयंवराच्या कथा प्रसिद्ध आहेत. स्वयंवरासाठी उपस्थित असलेल्या अनेक पुरुषांतून (राजपुत्रांतून) आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य स्त्रियांना होते. अशा प्रसंगी कुठला तरी पण (शर्यत) लावत. अर्थात ही स्वयंवर पद्धत राजन्य वर्गापुरतीच मर्यादित असावी असे दिसते. राजकुळातील स्त्रिया आपल्या आवडत्या माणसाशी लग्न लावण्यासाठी देवांनादेखील कसे झिडकारून लावत हे दमयंतीच्या कथेवरून दिसते. ग्रीक ग्रंथकारांनी या प्रथेचा उल्लेख केला आहे.

**१२) स्त्री व प्रशासन :** स्त्रियांवर धर्मसुधारकांनी व स्मृतिकारांनी असंख्य बंधने लादली असली तरी कर्तबगार स्त्रियांची काही उदाहरणे दिसतात. १) कैकयीने दशरथाला युद्धात मदत करून वरप्राप्ती करून घेतली होती. २) द्रौपदी पांडवांशी सल्लामसलत करत असे. ३) नरकासुराच्या वधात सत्यभामेने श्रीकृष्णाला मदत केली होती.

**१) नागनिका :** सातवाहन राजा सातकर्णी पहिला याची पत्नी नागनिका ही मोठी कर्तबगार स्त्री होती. सातकर्णी पहिल्याच्या मृत्यू वेळी वेदश्री व सतीश्री ही दोन लहान मुले तिला होती. नागनिकेने अनेक वर्षे संन्यस्त वृत्तीने राहून साम्राज्याचा कारभार पाहिला. नाणेघाटातील सातवाहन कुळातील स्त्री-पुरुषांचे पुतळे व लेख तिनेच कोरविले.

**२) बलश्री सातकर्णी :** सातवाहनांचा विख्यात सम्राट गौतमीपुत्र सातकर्णी याची ती आई होती. त्याने शकांच्या दास्यांतून महाराष्ट्राला मुक्त केले. त्याचे श्रेय

विद्वानांच्या मते त्यांच्या मातेला आहे. मिराशी यांनी गौतमीपुत्र सातकर्णी व बलश्री सातकर्णी यांची तुलना शिवछत्रपती व जिजामाता यांच्याशी केली आहे. नाशिकच्या सातवाहन लेण्यांत आपल्या पुत्राच्या गौरवाचा लेख तिनेच कोरविला.

**३) प्रभावती गुप्त :** वाकाटक राजा दुसरा रुद्रसेन याची ही पत्नी होय तर गुप्तसम्राट पहिल्या चंद्रगुप्ताची ही कन्या होय. पतीच्या मृत्यूनंतर पुत्र लहान असल्याने तिने १२ वर्षे राज्यकारभार केला. तिच्या मदतीसाठी चंद्रगुप्ताने आपले अधिकारी व मुत्सद्दी तिच्या दरबारी पाठवले होते.

४) काही स्त्रिया राज्यपाल म्हणून काम करत असल्याचे उल्लेख आहेत. बदामीचा चालुक्य राजा याच्या भावाची पत्नी विजयभट्टरिका ही राज्यपाल होती. कल्याणी चालुक्य राजा सोमेश्वर याची राणी मैलादेवी ही वनवासी प्रांताची राज्यपाल होती.

५) सहावा विक्रमादित्य याची पट्टराणी लक्ष्मीदेवी एकंदर १८ अग्रहारांचा कारभार पाहत असे. क्षत्रिय स्त्रियांना लष्करी शिक्षण मिळे. मॅगेस्थिनिसने पांड्य देशात स्त्रियांचा अंमल होता असे नमूद करून ठेवले आहे. चंद्रगुप्त मौर्याच्या स्त्री रक्षकाचा उल्लेख मॅगेस्थेनिसने केला आहे.

**१३) स्त्री व नृत्य-गायन चित्रकला :** वैदिक व त्यानंतरच्या काळातही स्त्रिया (विशेषतः राजघराण्यांतील) नृत्य, गायन, चित्रकला याचा मनोभावे अभ्यास करत असत असे तत्कालीन काव्य, नाटकांवरून दिसते. सम्राट हर्षाची बहीण राजश्री ही नृत्यगायनादी कलांत निपुण होती. शकुंतलेची सखी अनसूया हिने चित्रकला अभ्यासली होती. तिला इतिहासाचे ज्ञानही होते. मालविका तर नृत्य-गायनांचे नियमित पाठ घेत असे. 'रत्नावली'त सागरिका आपल्या पित्याचे चित्र काढते. 'मालतीमाधव'मधील मालतीही असेच चित्र काढते. हर्षाच्या 'प्रियदर्शिका'त नृत्य, गायन, वादन या उच्च कला मानलेल्या असून तरुण-तरुणींनी त्याचा अभ्यास आवर्जून करावा असे सांगितले आहे. वात्स्यायनाने आपल्या कामसूत्रात स्त्रियांनी ६४ कलांचा अभ्यास करावा असे आग्रहाने प्रतिपादिले आहे. त्याने आदर्श गृहिणीचे चित्र रेखाटले आहे. त्यांत संसारातील सर्व जमाखर्चाचे ज्ञान तिला असावे असे म्हटले आहे.

गुप्तकालीन साहित्यावरून असे दिसते की, थोर कुळांतील स्त्रिया व आश्रमवासी स्त्रिया इतिहास व पुराणे यांचे वाचन करीत असत व काव्यरचनाही करीत. 'गाथा सप्तसई'तील अनेक गाथा स्त्रियांनी रचल्या आहेत.

**१४) पडदा पद्धत :** प्राचीन काळात पडदा पद्धत अस्तित्वात होती की नाही याबद्दल इतिहासकारांत मतभेद आहेत. मुस्लिमांचा भारतात प्रवेश होण्यापूर्वी ही पद्धत भारतात मुळीच प्रचलित नव्हती असे एक मत आहे तर काहींना हे मत मान्य नाही.

ख्रिस्तपूर्व काळात ही पद्धत भारतात मुळीच नव्हती प्रचलित हे नक्की. कारण

वैदिक वाङ्मय महाकाव्ये व नंतरच्याही वाङ्मयात या पडदा पद्धतीचे उल्लेख येत नाहीत. वैदिक काळात, महाकाव्यातही प्रौढविवाह, प्रेमविवाह, सार्वजनिक जीवनातील स्त्रियांचा सहजपणे दिसणारा सहभाग आदींचे उल्लेख मोठ्या प्रमाणात आहेत. त्यावरून खिस्तपूर्व काळात ही पद्धत अस्तित्वात असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे वाटते.

इ.स. २०० च्या सुमारास काही रॉयल फॅमिलीजमधून ही पद्धत सुरू झाली. भासाच्या नाटकांतून या पद्धतीचे काही उल्लेख आले आहेत. मुस्लिम आगमनाबरोबर ही पद्धत भारतात रूढ झाली.

गुप्तकाळात पडदा पद्धत अस्त्विात होती; पण ह्यू-एन-त्संगने त्याच्या प्रवास वर्णनात पडदा पद्धत अस्तित्वात होती असे म्हटले नाही.

१५) शिल्पाकृतीत जी स्त्रियांची चित्रे आहेत त्यातही पडदा पद्धत अस्तित्वात नव्हती.

**गणिका :** वात्स्यायनाच्या 'कामसूत्र' या ग्रंथातही गणिकांचे उल्लेख केले आहेत. सौंदर्य, बुद्धिमत्ता यासाठी त्या प्रसिद्ध असत.वात्स्यायनाच्या कामसूत्रावरून गणिका या सौंदर्य, शिष्टाचार विनोदबुद्धी यासाठी प्रसिद्ध होत्या.

**विवाह संस्कार :** भारतीय जीवनात महत्त्वाचे स्थान पवित्र संस्कार मानले जाई. जन्मोजन्मी विवाहाचा संबंध राहतो. मृत्यूनेदेखील स्त्री-पुरुष विभक्त होत नाहीत असा समज होता. विवाहामुळे दोन आत्म्यांचे मिलन होते. घटस्फोट फारसे प्रचलित नव्हते. कोणत्याही परिस्थितीत पती-पत्नीचे संबंध तोडण्यास समाज तयार होत नसे. व्यभिचारी स्त्रीची समाजात मानहानी होई. पत्नीला निष्कारण टाकल्यास पती गुन्हेगार होतो. राजाने त्यास दंड करावा असा नियम होता.

**१६) वेश्याव्यवसाय** : समाजाची नीतिमत्तेची बंधने न मानणाऱ्या वेश्या किंवा गणिका प्राचीन भारतातदेखील होत्या. संस्कृत वाङ्मयातून वेश्या या सुसंस्कृत, सुस्वरूप व संपन्न अशा आहेत. ६४ कलांत त्यांना पारंगतता संपादन करावी लागे. अप्सरांची गणना याच जातींच्या स्त्रियांत करता येईल. अप्सरा या देवलोकीच्या नृत्यांगना असून त्यांची ७ प्रख्यात कुळे आहेत.

**आम्रपालीची कथा :** बौद्ध ग्रंथांतून जी या वेश्येची कथा आली आहे त्यावरून तत्कालीन वेश्याव्यवसायाची कल्पना येते. आम्रपाली ही अत्यंत सुंदर, सुसंस्कृत व ६४ कलांत पारंगत होती. ती वैशालीच्या एका सधन नागरिकाची कन्या होती. तिने लग्न न करता गणिकेचे जीवन जगावे असे नागरिकांनी ठरविले व ते तिने मान्य केले. मगध देशाचा राज्यपाल बिंबिसार याने तिला भेट दिली होती. गौतम बुद्धानेदेखील तिचे भोजनाचे आमंत्रण स्वीकारले होते. आम्रपाली पुढे भिक्षुणी झाली. 'मृच्छकटिक' या नाटकाची नायिका ही प्रथम वेश्याच असते.

चंद्रगुप्ताच्या काळात वेश्यांना सरकारी संरक्षण मिळे. त्यांच्यावर देखरेख करण्याकरिता एक स्वतंत्र अधिकारी नेमला जात असे. राजनर्तकी, वेश्या यांच्याकडून त्यांची महिन्यातील दोन दिवसांची कमाई कररूपाने वसूल केली जात असे.

प्राचीन व मध्ययुगाच्या काळातदेखील राजकुलात विड्यांचे पान तयार करणे, राजाला हवा घालणे अशी कामे वेश्या करत असत. तसेच राजकुलांसाठी गाणे, नाच, नाटके सादर करणे ही कामे करत. Hair-dressers म्हणून काम करत. गुप्तचर खात्यात वेश्या काम करत. देवळांतून गाणी म्हणण्याचे कामही अशा स्त्रिया करत. पुराणांत व कालिदासाच्या लिखाणात त्यांचे उल्लेख आले आहेत. आपले मूल देवास दान करण्याच्या पद्धतीतूनच देवदासी प्रथा पुढे जन्मास आली. अनेक शिलालेखांतून (विशेषत: दक्षिण भारत) Dancing girls with temple service चा उल्लेख आहे. ९ व्या शतकात ही पद्धत विशेष रूढ दिसते.

**१७) स्त्रिया व वेदाधिकार :** वैदिक कालखंडात स्त्रियांना वेदाधिकार होते. मुलाप्रमाणेच मुलीचे पण उपनयन होत असे. अनेक स्त्रियांनी (उदा. आपाला, घोषा, लोपामुद्रा) वेदांची रचना केली आहे.

प्राचीन काळी समाजधुरिणांचे स्त्रीबद्धल वाईट मत नव्हते. स्त्रियांच्या बुद्धीविषयी, तपश्चर्येविषयी चांगले मत होते. त्यामुळे ज्ञानाच्या क्षेत्रातले सर्व अधिकार तिला दिले होते. स्त्रीला वेदविद्या शिकवली जात असे आणि त्या संध्याही करत. सीता संध्या करत असल्याचा उल्लेख रामायणात आले आहेत. पण स्मृतिकाळात स्त्रीचा वेदपठण, वेदमंत्र म्हणण्याचा अधिकार काढून घेण्यात आला. एकूण सर्वच स्मृतिकारांच्या मते, स्त्रीला वेदाधिकार नाही, यज्ञ करण्याचा स्त्रीचा हक्क काढून घेण्यात आला. वात्स्यायनाने मुलीचे उपनयन करू नये असे सांगितले.

वेदसूक्ते रचणारी, यज्ञ करणारी व ब्रह्मवादिनी म्हणून गौरविली गेलेली स्त्री स्मृतिकाळात अविद्या ठरली. परिणामी तिच्या मनाची व बुद्धीची वाढ खुंटली.

**१८) स्त्री संपत्ती व कायदा :** वैदिक काळात स्त्रीला आपल्या पित्याच्या मालमत्तेचा वाटा मिळे. मुलींना पित्याच्या संपत्तीत योग्य तो भाग हुंड्याच्या रूपाने विवाहप्रसंगी मिळत असे. अविवाहित मुलींना तर इतर मुलांप्रमाणेच वडिलांच्या संपत्तीत हिस्सा मिळे. ज्या मुलींना भाऊ नसेल त्या स्त्रिया वडिलांच्या संपत्तीच्या पूर्णत: भागीदार होत्या. पुत्रहीन पिता आपल्या कन्येची पुत्रिका म्हणून नेमणूक करी. पण सर्वसाधारणपणे ९० टक्के विवाहित स्त्रिया आपल्या वडिलांच्या मालमत्तेत हक्क मागत नसत. विधवा स्त्रियांना मात्र मृत पतीच्या मालमत्तेत इ.स.पू. तिसऱ्या शतकापूर्वी कोणताही अधिकार नसे. धर्मग्रंथांनी हा विधवांचा अधिकार नाकारला आहे.

स्त्रियांना वेद, यज्ञ करण्याचा अधिकारही Post Vedic Period मध्ये नाकारल्याने

सर्वच स्त्रियांचा संपत्ती बाळगण्याचा अधिकार काढून घेण्यात आला. मनुच्या मते, "पत्नी, पुत्री व गुलाम यांची मालमत्ता असू शकणार नाही. त्यांनी संपत्ती मिळवली असेल तर ती आपल्या मालकासाठी मिळवली असे म्हणावे."

स्त्री ही पुरुषाची संपत्ती आहे असे वशिष्ठाचे मत होते.

**१९) वैवाहिक जीवन :** विवाहित स्त्रीला वैदिक कुटुंबात मानाचे स्थान होते; पण पुढे जेव्हा बालविवाहाची पद्धत सुरू झाली तेव्हा मात्र दृष्टिकोन बदलला. तरीही स्त्रिया सर्वसाधारणपणे पतिव्रतेचे जीवन जगत. तिचा आनंद, सुखदु:खे पतीच्या आनंद व सुखदु:खांशी एकनिष्ठ असे.

शिवण-टिपण स्त्रियाच करत. काही स्त्रिया शेतकामास पुरुषांना सहकार्य करत. खर्चाचे अंदाजपत्रक स्त्रियाच तयार करत. युधिष्ठिराचे अंदाजपत्रक (जमाखर्च) द्रौपदी ठेवत असे.

श्रीमंत व राजकुलांतील स्त्रिया नृत्य, संगीत, चित्रकला यात वेळ घालवत.

**२०) विवाहांचे ८ प्रकार :**विवाह हा एक महत्त्वाचा संस्कार होता. संतती व धर्मकार्ये पार पाडणे हे लग्नाचे मुख्य उद्देश होते. ब्राह्मण युगात विवाहांचे ८ प्रकार रूढ झाले व त्याचे पालन, अस्तित्व पुढे कित्येक शतके कायम राहिले. ब्राह्मण ग्रंथात तसेच गृहसूत्रात व धर्मसूत्रांत विवाहाच्या ८ प्रकारांचा उल्लेख आहे. गृह्य सूत्रात लग्नाचे हंगाम व वर-वधूची पात्रता, लग्नविधीतील टप्पे आदींबाबतचे नियम आहेत.

**१) ब्रह्म विवाह :** विद्वान व शीलवान तरुणास आपली मुलीचे सालंकृत कन्यादान करून देणे.

**२) दैव विवाह :** विद्वान व तरुण पुरोहिताला दक्षिणेऐवजी कन्या अर्पण करणे.

**३) आर्य विवाह :** वरांकडून मोबदला घेऊन कन्या देणे.

**४) प्रजापत्य विवाह :** वराकडून काही न घेता अथवा काही न देता कन्या देणे.

**५) असुर :** विवाह वधूला किंवा वरपित्याला धन, पैसा देऊन जो विवाह होतो त्यास असुर विवाह म्हणत दशरथ-कैकयी, पांडू-माद्री हे असुर विवाह होते.

**६) गांधर्व विवाह :** प्रियकर व प्रेयसी या दोघांच्या संमतीने होणारा हा प्रेमविवाहच असे. आईवडिलांची संमती आवश्यक नाही. उदा. दुष्यंत-शकुंतला विवाह.

**७) राक्षस विवाह :** वधूचे सक्तीने अपहरण करून तिच्याशी विवाह लावणे. अर्जुन-सुभद्रा, श्रीकृष्ण-रुक्मिणी हा राक्षस विवाह होता. विशेषत: लढाऊ गणांत हा प्रकार रूढ होता.

**८) पैशाच विवाह :** स्त्री झोपलेली असताना अथवा तिने मद्यप्राशन केले असता तसेच बेशुद्धावस्थेत असताना तिच्यावर बलात्कार करून तिच्याशी लग्न करणे. हा विवाहाचा प्रकार अत्यंत निंद्य मानला जाई. मनूच्या मते पहिले ४ विवाह ब्राह्मणास

योग्य, क्षत्रियांना राक्षस विवाह, वैश्य, शूद्रांना असुर विवाह योग्य आहेत. राक्षस व पैशाच विवाहांत व त्यापासून होणाऱ्या संततीला समाजात मुळीच मान्यता नव्हती.

**अनुलोम विवाह :** उच्च वर्णातील वर व कनिष्ठ वर्णातील वधू म्हणजे अनुलोम विवाह होय. पराशर, सत्यवती, आगस्त्य लोपामुद्रा ही अनुलोम विवाहाची उदाहरणे आहेत.

**प्रतिलोम विवाह :** अनार्य पुरुष व आर्य स्त्री यांच्यातील विवाहास तसेच कनिष्ठ वर्गातील वर व उच्च वर्णातील वधू म्हणजे प्रतिलोम विवाह होय. अशा विवाहातून जन्मलेल्या संततीला चांडाळ म्हटले जाई. आर्य-अनार्य यांच्यातील विवाहाचे उदा. सजातीय विवाहवर भर दिला जाई. सगोत्र विवाहास परवानगी.

**२१) घटस्फोट व विधवांचा पुनर्विवाह :** काही विशिष्ट परिस्थितीत स्त्रियांचा पुनर्विवाहाचा हक्क ऋग्वेदातही मान्य करण्यात आला होता. धर्मसूत्रकारांनी स्त्रियांना काही विशिष्ट परिस्थितीत पुन्हा विवाह करण्याची परवानगी दिली होती. उदा. पती परागंदा झाला; २) संन्यासी बनला, ३) त्याने वर्ण बदलला, ४) नपुंसकत्व आले.

पती धर्मकार्याकरिता गेला असेल तर पत्नीने ६ वर्षे वाट पाहावी, कीर्ती व पैशासाठी तो गेला असेल तर ३ वर्षे वाट पाहावी असे मनूने म्हटले आहे.

तसेच १) विवाहिता दोन वर्षे पुत्रहीन राहिली, २) संतती जिवंत राहत असेल तसेच पत्नी उद्धट व पुत्रहीन असेल तर पत्नीने दुसरा विवाह लग्नानंतर दहाव्या वर्षी करावा असे मनू म्हणतो.

**घटस्फोटाचे नियम :** सर्वसाधारणपणे पत्नी मद्यपान करणारी असेल; व्याधिग्रस्त लंबाड, वांझ, द्रव्यनाश करणारी, कर्कश किंवा केवळ मुलींनाच जन्म देणारी असेल तर तिला टाकून देऊन दुसऱ्या स्त्रीशी विवाह करावा असे याज्ञवल्क्य म्हणतो.

मनूला घटस्फोट मान्य नव्हता. तो म्हणतो की पती-पत्नी एकच असतात. कुमारिकेच्या आयुष्यात तिचे फक्त एकदाच लग्न होते.

घटस्फोटाची उदाहरणे मात्र साहित्यातून आढळत नाहीत. कौटिल्याने असा नियम घालून दिला आहे की परत येण्याचे वचन देऊन प्रवासाला गेलेल्या पती परत न आल्यास वाट पाहावी व पुन्हा विवाह करावा. पण संतती असल्यास व उपजीविकेची तरतूद केली असल्यास हा वाट पाहण्याचा कालखंड जास्त आहे.

१) ब्राह्मण स्त्रीने ४ वर्षे

२) क्षत्रिय - ३ वर्षे

३) वैश्य - २ वर्षे

४) शूद्र - १ वर्ष

कारण नसताना बायकोला सोडून देणाऱ्या पुरुषावर आपस्तंभ धर्मसूत्रात खूप दंड बसवला पाहिजे असे म्हटले आहे.

हिरण्यकेशी ब्रह्मसूत्र व गौतम गृह्यसूत्रात सगोत्र व सपिंड विवाहाचा निषेध करण्यात आला आहे. विश्वामित्र, भारद्वाज, गौतम, अत्री, वशिष्ठ कश्यप व अगस्ती हे ऋषी मूळ गोत्रकार म्हणून सांगितले आहेत.

मनू व याज्ञवल्क्य पुनर्विवाहास विरोध करतात तर गारद, पराशर स्पष्ट परवानगी देतात.

**२२) हुंडा पद्धती :** वधू अपंग असेल तर हुंडा देण्याचा प्रघात ऋग्वेद काळात होता. ब्रह्म, दैव विवाहात वधूपिता हुंडा देऊन (सालंकृत कन्यादान) मुलीचे विवाह करत. अशा विवाहांना समाजमान्यता व प्रतिष्ठा होती. हुंड्याची पद्धत होती पण ती अत्यंत मर्यादित स्वरूपात अर्थात या सालंकृत कन्यादानास वधूपित्याची आजच्याप्रमाणे पिळवणूक होत नव्हती वा आजच्याप्रमाणे त्यावेळी लग्नास बाजारी स्वरूप आले नव्हते.

**२३) दत्तक पद्धती :** स्वत:ला मुलगा नसेल तर भावाचा किंवा जवळच्या नात्यातील मुलगा दत्तक घेण्याची प्रथा वैदिक काळातही रूढ होती. पुढील कित्येक शतके ती कायमच राहिली.

**२४) कन्याविक्रय :** वधूपित्याला पैसा देऊन कन्या मिळवणे म्हणजे कन्याविक्रय होय. वैदिक वाङ्‌मयात कन्याविक्रयाचा उल्लेख येतो. तथापि पत्नी विकत घेणे हे कमीपणाचे मानत. सूत्रकालापासून कन्याविक्रयाला विरोध होऊ लागला. १) धर्मसूत्रकारांनी कन्याविक्रयाचा निषेध केला असून अशा स्त्रीस धर्मपत्नीत्व प्राप्त होत नाही असा निर्वाळा दिला आहे. २) लोभी वृत्तीने वधूपित्याने कन्याशुल्क घेऊ नये असे मनू म्हणतो, ३) कन्याविक्रय करणाराचे तोंडदेखील पाहू नये असे पद्मपुराणात सांगितले आहे.

**२५) देवदासी :** मंदिरातून पूजाप्रसंगी संगीत, नृत्य करण्यासाठी देवदासी ठेवण्याची पद्धत दक्षिण भारतात होती. अनेक पुराणांतून देवदासी वाहण्याच्या प्रथेचे वर्णन केले आहे. मुलतानच्या सूर्यमंदिरात देवदासी असल्याचा उल्लेख ह्यु-एन-त्संग करतो. सोमनाथच्या मंदिरात ५०० देवदासी होत्या. चोल राजाने त्यांच्यासाठी जमिनीचे उत्पन्न लावून दिले होते.

**२६) अलंकार व सौंदर्यप्रसाधने :** लिखित प्राचीन साहित्यातून तसेच लेण्यांतील, मंदिरातील स्त्रियांची कोरलेली चित्रे यावरून स्त्रियांचे अलंकार व केशभूषा, सौंदर्यप्रसाधने आदींची कल्पना येते. प्रसंगी श्रीमंत लोक सोन्या-चांदीचे दागिने तर गरीब लोक चांदीचे दागिने वापरत.

चंदनाची उटी अंगास लावण्याची पद्धत होती. काजळ लावत. सुगंधी तेले, अत्तरे वापरली जात. डोळ्यांत अंजन घालून डोळ्यांची शोभा वाढवत. अलंकार, रिंग,

नेकलेस, कर्णभूषणे, बाहुभूषणे, पैंजण, बांगड्या आदी प्रमुख अलंकार होते. अलंकाराने शरीर नटवले जाई. शुभप्रसंगी श्रीमंत लोक सोन्याचे दागिने घालत.

**२७) वेशभूषा व केशभूषा :** श्रीमंत कुटुंबांतील स्त्रिया विविध रंगांची वस्त्रे, रेशमी वस्त्रे वापरत. फ्रॉक, जाकीट, लोकर वापरत. पण या फॅशन्स फक्त श्रीमंत वर्गापुरत्याच मर्यादित होत्या. कलावंतांचा स्त्री सौंदर्यविषयक दृष्टिकोन आश्चर्यचकित करणारा आहे.

स्त्रिया, नृत्य, संगीत, वाद्ये, नाटके आदींतून स्वत:ची करमणूक करत व पुरुषांचीही करमणूक करत.

ओठ, गाल, नखे व पाय रंगवणे आदींचे उल्लेख आहेत.

अजिंठ्याच्या लेण्यांतील विविध प्रकारची आकर्षक, मनोवेधक केशभूषा पाहता त्या काळी ती अत्यंत प्रगत अवस्थेत असावी.

मथुरा म्युझियममध्ये स्त्रियांच्या केशभूषा दाखवणाऱ्या शिल्पाकृती ठेवल्या आहेत.

मौर्य, गुप्त व हर्षकाळात स्त्रियांच्या वेशभूषांचे अनेक प्रकार अस्तित्वात होते.

ह्यू-एन-त्संग व इत्सिंग यांनीही अनेक केशभूषांचा उल्लेख केला आहे.

स्त्रियादेखील सुरापानाचा उपभोग घेत असत असा उल्लेख तत्कालीन साहित्यात